29 JAN 2025
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा निसर्ग साकारला कॅनव्हासवर

## निसर्गचित्रण स्पर्धेत १२० चित्रकारांचा सहभाग : पहिल्या पाच चित्रकारांचा सन्मान



कोल्हापूर : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह मान्यवरांसोबत शिवाजी विद्यापीठातील राज्यस्तरीय प्रत्यक्ष निसर्गचित्रण स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट पाच विजेते.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या निसर्गरम्य परिसरावर पसरलेली कोवळी उन्हे, त्या उन्हामध्ये ठिकठिकाणी समोरील कॅनव्हासवर हा निसर्ग उतरविण्यात गुंग झालेले निरनिराळ्या वयोगटातील चित्रकार. त्यांची कलाकारी पाहण्यासाठी त्यांच्याभोवती विद्यार्थ्यांची कुतूहलपूर्ण गर्दी जमली होती. शिवाजी विद्यापीठाच्या संपूर्ण परिसरात हेच दृश्य पहावयास मिळत होते. निमित्त होते संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित 'राज्यस्तरीय प्रत्यक्ष निसर्गचित्रण स्पर्धा-२०२५'चे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी कॅनव्हासवर निसर्गचित्र रंगवून स्पर्धेचे उद्घाटन केले.

विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे प्रथमच विद्यापीठात प्रत्यक्ष निसर्गचित्रण स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेला राज्यभरातील चित्रकारांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. पश्चिम महाराष्ट्रासह बेळगाव, मुंबई, पुणे, रत्नागिरी इत्यादी ठिकाणांहून १२० चित्रकार सहभागी झाले होते. कलाकारांनी भावलेल्या दृष्याची निवड करून तेथे बसून चित्र काढण्यामध्ये चित्रकार गुंगू होते. स्पर्धेचे पारितोषिक वितरण कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. ही स्पर्धा विद्यार्थी विभाग आणि खुला कलाकार विभाग अशा दोन विभागांत झाली. दोन्ही विभागांमध्ये सर्वोत्कृष्ट पाच चित्रकारांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह आणि रोख ५००० रुपये असे पारितोषिकाचे स्वरुप होते.

प्रास्ताविक डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले. डॉ. राजश्री खटावकर यांनी आभार मानले. चित्रकार बबन माने, नृत्यदिग्दर्शक संग्राम भालकर, नागेश हंकारे यांनी स्पर्धेचे संयोजन केले. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, माजी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड उपस्थित होते.

### सर्वोत्कृष्ट निसर्ग चित्र

विद्यार्थी विभागात विशाल सुतार (मुंबई), पियांशू मीठगरी (देवरूख, रत्नागिरी), नीलेश उडमाळे (मुंबई), सचिन बामणे (मुंबई) आणि सुजल निवटे (सावर्डे, रत्नागिरी) यांची चित्रे सर्वोत्कृष्ट ठरली. तर खुल्या कलाकार विभागात विजय उपाध्ये (कोल्हापूर), गौरव साखरे (सांगली), संदीपकुमार कुंभार (इचलकरंजी), प्रणय फराटे (रत्नागिरी) आणि सुधीर वाघ (सांगली) यांची चित्रे सर्वोत्कृष्ट ठरली. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून ज्येष्ठ चित्रकार सुनील पुजारी (मुंबई), शरद तावडे (मुंबई) आणि महेश होनुले (बेळगाव) यांनी काम पाहिले.

29 JAN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कॅनव्हासवर उतरला विद्यापीठाचा निसर्ग

## रंगली राज्यस्तरीय स्पर्धा; १२० कलाकारांचा आविष्कार





**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठात आयोजित राज्यस्तरीय प्रत्यक्ष निसर्गचित्रण स्पर्धेत सहभागी कलाकार समोरील परिसर कॅनव्हासवर उतरविताना. दुसऱ्या छायाचित्रात निसर्गचित्रण स्पर्धेच्या खुल्या कलाकार विभागातील सर्वोत्कृष्ट पाच विजेते कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह मान्यवर.

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठाच्या निसर्गरम्य परिसरावर पसरलेली कोवळी उन्हे, त्या उन्हामध्ये ठिकठिकाणी समोरील कॅनव्हासवर हा निसर्ग उतरविण्यात गुंग झालेले निरनिराळ्या वयोगटांतील चित्रकार आणि त्यांची कलाकारी पाहण्यासाठी त्यांच्याभोवती जमलेली विद्यार्थ्यांची कुतूहलपूर्ण गर्दी. विद्यापीठाच्या संपूर्ण परिसरात आज सकाळी नऊ वाजल्यांपासून तीन वाजेपर्यंत हेच दृश्य पाहावयास मिळत होते. निमित्त होते संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित 'राज्यस्तरीय प्रत्यक्ष निसर्गचित्रण स्पर्धा-२०२५' चे.

विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे प्रथमच विद्यापीठात प्रत्यक्ष निसर्गचित्रण स्पर्धा आयोजित करण्यात आली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी कॅनव्हासवर निसर्गचित्र रंगवून स्पर्धेचे अभिनव पद्धतीने उद्घाटन केले.

पश्चिम महाराष्ट्रासह बेळगाव, मुंबई, पुणे, रत्नागिरी आदी ठिकाणांहून १२० चित्रकार यात सहभागी झाले. आपल्याला भावलेल्या दृश्याची निवड करून तेथे कलाकार चित्र काढण्यासाठी बसले. कोवळ्या उन्हाचे दुपारी तळपत्या उन्हात रूपांतर झाले, तरी त्याचे भान या चित्रकारांना राहिले नव्हते, इतके ते चित्र काढण्यामध्ये गुंगून गेल्याचे दिसले.

सायंकाळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. विद्यार्थी आणि खुला कलाकार विभागांतील प्रत्येक सर्वोत्कृष्ट पाच चित्रकारांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, माजी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड उपस्थित होते.

डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी प्रास्ताविक केले. डॉ. राजश्री खटावकर यांनी आभार मानले. चित्रकार बबन माने, नृत्यदिग्दर्शक संग्राम भालकर, नागेश हंकारे यांनी स्पर्धेचे यशस्वी संयोजन केले.

### स्पर्धेतील विजेते असे


■ विद्यार्थी विभागात विशाल सुतार, नीलेश उडमाळे, सचिन बामणे (मुंबई), पियांशू मीठगरी (देवरूख), सुजल निवटे (सावर्डे, रत्नागिरी) यांची, तर खुल्या कलाकार विभागात विजय उपाध्ये (कोल्हापूर), गौरव साखरे (सांगली), संदीपकुमार कुंभार (इचलकरंजी), प्रणय फराटे (रत्नागिरी), सुधीर वाघ (सांगली) यांची चित्रे सर्वोत्कृष्ट ठरली. परीक्षक म्हणून ज्येष्ठ चित्रकार सुनील पुजारी, शरद तावडे, महेश होनुले यांनी काम पाहिले.

29 JAN 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# निसर्ग कॅनव्हासवर..!



शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित राज्यस्तरीय प्रत्यक्ष निसर्गचित्रण स्पर्धेला राज्यभरातील चित्रकारांचा प्रतिसाद लाभला. मंगळवारी झालेल्या या निसर्गचित्रण स्पर्धेत एका कलाकाराने समोरील परिसर कॅनव्हासवर उतरवला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JAN 2025
सकाळ

# ग्रंथालयांच्या तंत्रज्ञानात्मक भवितव्याबाबत परिषद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील बॅ. खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र, ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग आणि महाविद्यालयीन ग्रंथालय संघटनेतर्फे राजर्षी शाहू सिनेट सभागृहात बुधवारी 'टेक्नो लाइब्ररीयनशिप : अ गेटवे टूवर्डस फ्युचर लायब्ररीज्' या विषयावर राष्ट्रीय परिषद होणार आहे. या परिषदेत डॉ. विनायक बंकापूर (राणी चन्नमा विद्यापीठ, बेळगाव) आणि किशोर इंगळे (टाटा कन्सलटन्सी) मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JAN 2025

सकाळ

# ई-कन्टेन्टवर विद्यापीठात आजपासून कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे दूरशिक्षण व ऑनलाईन केंद्र आणि एम. ए. मास कम्युनिकेशन विभाग यांच्यातर्फे पी.एम. उषा योजनेंतर्गत 'डिजिटल ॲन्ड डेव्हलमेंट ऑफ ई-कन्टेन्ट फॉर ऑनलाईन लर्निंग' या विषयावर बुधवारी (ता. ३०) आणि गुरुवारी(ता. ३१) कार्यशाळा होणार आहे. दूरशिक्षण केंद्रात बुधवारी सकाळी अकरा वाजता कार्यशाळेच्या उद्घाटनास शासनाच्या महास्वयंमचे प्रशिक्षक गणेश लोखंडे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. सायबर कॉलेजचे डॉ. राजेंद्र पारिजात, व्हिडिओ एडिटर अक्षय दळवी मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती डॉ. के. बी. पाटील यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JAN 2025

पुढारी

# ई-कंटेंट विषयावर आजपासून कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे दूरशिक्षण व ऑनलाईन केंद्र व एम.ए. मास कम्युनिकेशन विभागाच्या संयुक्त विद्यमाने पीएम उषा योजनेअंतर्गत डिजिटल अँड डेव्हलपमेंट ऑफ ई-कंटेंट फॉर ऑनलाईन लर्निंग विषयावर २९ व ३० जानेवारी रोजी दोनदिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे. दूरशिक्षण केंद्रात सकाळी ११ वाजता कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. महास्वयमचे प्रशिक्षक गणेश लोखंडे उपस्थित राहणार आहेत. डॉ. राजेंद्र पारिजात व व्हिडीओ एडिटर अक्षय दळवी प्रशिक्षण देणार आहेत, अशी माहिती डॉ. के. बी. पाटील व डॉ. शिवाजी जाधव यांनी दिली.